# इ. ११ वी केंद्रीय प्रवेश समिती, पुणे

## सन २०१२-१३

## मुख्य समन्वय केंद्र - फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे ४.

प्रति, दि. १३.६.२०१२

प्राचार्य / प्राचार्या, ________

पुणे.

पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील विद्यार्थ्यांसाठी इ. ११ वी चे प्रवेश केंद्रीय पध्दतीने गेली १७ वर्ष यशस्वीपणे समिती करीत आहेत. या वर्षी सुध्दा हे प्रवेश केंद्रीय पध्दतीने होणार आहेत. यासाठी फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे ४ हे मुख्य समन्वय केंद्र असेल.

पालक आणि विद्यार्थ्यांना या प्रवेश प्रक्रियेतील सर्व तांत्रिक आणि आवश्यक गोष्टींची माहिती देण्यासाठी केंद्रीय प्रवेश समितीतर्फे गेल्या अनेक वर्षांपासून उदबोधन वर्गांचे आयोजन केले जाते. यावर्षी सुध्दा अशा प्रकारच्या उदबोधन वर्गांचे आयोजन केले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १. | म्हाळसाकांत कनिष्ठ महाविद्यालय, आकुर्डी, पुणे | १६.६.२०१२ | स. ११.०० वा. |
| २. | मुक्तांगण हायस्कूल व क.म.वि. पर्वती, पुणे ९. | १६.६.२०१२ | दु. ४.०० वा. |
| ३. | आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे ४. | १७.६.२०१२ | स. ११.०० वा. |
| ४. | साधना महाविद्यालय, हडपसर, पुणे. | १७.६.२०१२ | दु. ४.०० वा. |
| ५. | मॉडर्न महाविद्यालय, पुणे. | १८.६.२०१२ | दु. ४.०० वा. |
| ६. | नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे १ | १९.६.२०१२ | दु. ४.०० वा. |
| ७. | मराठवाडा वाणिज्य महाविद्यालय, पुणे ४ | २०.६.२०१२ | दु. ४.०० वा. |

श्री. रामचंद्र जाधव, केंद्रीय प्रवेश समितीचे अध्यक्ष तथा शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, श्री. पी. पी. साबळे, केंद्रीय प्रवेश समितीचे सचिव तथा सहाय्यक शिक्षण संचालक, पुणे विभाग, डॉ. आर. जी. परदेशी, केंद्रीय प्रवेश समितीचे कार्याध्यक्ष तथा प्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे तसेच जगदीश चिंचोरे केंद्रीय प्रवेश समितीचे सदस्य तथा निवृत्त उपप्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, पुणे ५, रेखा पळशीकर, प्रवेश समितीचे सदस्या तथा उपप्राचार्य, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे ४. अजीज शेख, केंद्रीय प्रवेश समितीचे सदस्य तथा उपप्राचार्य, पुना कॉलेज, पुणे, हे उपरोक्त नमूद उदबोधन वर्गांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित राहणार आहेत.

सदर उदबोधन वर्गांसाठी आपल्या महाविद्यालयात प्रोजेक्टर, माईक, स्पीकर तसेच लाईटची व्यवस्था व्यवस्थितपणे तयार ठेवावी.

विद्यार्थी व पालकांपर्यंत प्रवेश प्रक्रिया पोहचण्यासाठी हे उदबोधन वर्ग नेहमीच उपयुक्त ठरले आहेत. तरी उदबोधन वर्गांच्या वेळापत्रकास प्रसिध्दी द्यावी ही विनंती.

**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग, पुणे-१.**
तथा **अध्यक्ष**
**इ.११ वी केंद्रीय प्रवेश**
**समिती. पुणे**